**<u>ठळक बातम्या</u>**

- उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यात ढगफुटी आणि पुरामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्त हानी

- भारत आणि फिलीपिन्स यांच्यात आज ९ सामंजस्य करार

- राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर टप्प्याटप्प्याने होण्याची शक्यता

**आणि**

- जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचं प्रदीर्घ आजारानंतर निधन

**<><><><><>**

उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यात धराली इथं आज दुपारी झालेली ढगफुटी आणि खिरगंगा नदीला आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणावर जिवीत आणि वित्त हानी झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे. या पुरामुळे धऱाली इथली संपूर्ण बाजारपेठ उद्धवस्त झाली आहे. या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाल्याचं उत्तरकाशीचे जिल्हाधिकारी प्रशांत आर्य यांनी सांगितलं.

लष्कराच्या जवानांचं पथक, SDRF, NDRF, जिल्हा प्रशासनानं घटनास्थळी तातडीनं मदत आणि बचाव कार्य सुरू केलं असून १५ ते २० नागरिकांना सुरक्षित बाहेर काढलं आहे. सुमारे ४० जण बेपत्ता असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. हवाई दलही लवकरच बचाव कार्यात सहभागी होणार आहे. धराली परिसरात हॉटेल, रेस्टॉरंट, रेस्ट हाऊस असल्यामुळे तिथं अनेक नागरिक असण्याची शक्यताही जिल्हाधिकाऱ्यांनी  वर्तवली.

धराली इथं झालेल्या ढगफुटी दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांना दूरध्वनी करून दुर्घटनेची सविस्तर माहिती घेतली.

<><><><><>

बिहारमधल्या मतदारयाद्यांच्या पुनरीक्षणाच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज सुरुवातीला दुपारी २ वाजेपर्यंत आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

गोंधळातच लोकसभेनं गोवा राज्याच्या विधानसभा मतदारसंघात अनुसूचित जमातींचं प्रतिनिधित्व पुनर्समायोजन विधेयक २०२४ मंजूर केलं. राज्यसभेनं गोंधळातच मणिपूरमध्ये १३ ऑगस्ट २०२५ पासून राष्ट्रपती राजवट आणखी ६ महिने वाढवण्याचा ठराव मंजूर केला.

<><><><><>

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेअंतर्गत दिलं जाणारी मदत वाढवण्याचा सध्या कुठलाही प्रस्ताव नसल्याचं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं. केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी लोकसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. या अंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात वर्षाला ६ हजार रुपये हस्तांतरित केले जातात.

<><><><><>

भारत आणि अमेरिका यांच्यात द्विपक्षीय व्यापार कराराबाबत केंद्र सरकार सक्रीय चर्चा करत असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी आज लोकसभेत दिली.  एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना ठाकूर यांनी सांगितलं की, या दोन्ही देशांमधील व्यापार आणि गुंतवणुकीला चालना देणं तसंच उभय देशांमधील व्यापारिक संबंध अधिक दृढ करणं हा या

कराराचा उद्देश आहे. यातून कृषी उत्पादन क्षेत्रामधील रोजगार निर्मितीला चालना मिळेल आणि आर्थिक वाढीस हातभार लागेल.

**<><><><>**

गुंतवणुकीसंबंधी घोटाळ्याच्या ७६ प्रकरणांमधे सेबीने कारवाई करुन सुमारे ९४९ कोटी रुपयांची रक्कम बाहेर काढली आहे. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज राज्यसभेत एका लेखी उत्तरात ही महिती दिली. सेबीप्रमाणेच, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ आणि इतर यंत्रणा देखील फसवणुकीच्या प्रकरणांची चौकशी करुन आवश्यक कारवाई करत आहेत असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

भारताची ई व्हिसा सुविधा जगातल्या १७२ देशांमधल्या नागरिकांना ३२ विमानतळ आणि ६ बंदरांवरून उपलब्ध असल्याचं केंद्रीय गृहराज्यमंत्री बंडी संजय कुमार यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. पर्यटक व्हिसा, व्यापार व्हिसा, वैद्यकीय व्हिसा, विद्यार्थी व्हिसा अशा तेरा श्रेणींमधे ई व्हिसा उपलब्ध आहे.

**<><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाची बैठक आज नवी दिल्लीत झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह रालोआचे इतर खासदार यावेळी उपस्थित होते. ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी ही विरोधकांची चूक होती असं भाष्य प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं. ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव यशस्वीपणे राबवल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी यांचं या बैठकीत अभिनंदन करण्यात आलं. सशस्त्र दलांच्या वचनबद्धतेचं कौतुक करणारा ठरावही सर्व खासदारांनी मंजूर केला. तसंच पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना यावेळी आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><>**

भारत आणि फिलीपिन्स यांच्यात आज ९ सामंजस्य करार झाले. यात दोन्ही देशातील धोरणात्मक संबंध, गुन्हेगारी-संरक्षण-विज्ञान आणि तंत्रज्ञान याबाबत परस्पर कायदेशीर सहकार्य यांचा समावेश आहे. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फिलीपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डीनांद रोमुअल देज मार्कोस ज्युनियर उपस्थित होते.

भारत आणि फिलीपिन्स यांच्यातल्या राजनैतिक संबंधांना ७५ वर्षे पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर फिलीपिन्सच्या राष्ट्राध्यक्षांच्या भारत भेटीला विशेष महत्त्व आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी संयुक्त संबोधनात म्हणाले.

प्राचीन काळापासून दोन्ही देशांमधे संबंध आहेत, असं सांगत पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी मार्कोस यांचे आभार मानले.

**होल्ड - प्रधानमंत्री बाइट**

संरक्षण क्षेत्रात दोन्ही देश परस्पर सहकार्य वाढवणार आहेत, असं फिलीपिन्सचे राष्ट्राध्यक्ष मार्कोस यावेळी म्हणाले. भारत आणि फिलिपिन्स यांनी दोन्ही देशांमधल्या द्विपक्षीय सहकार्यात वाढ करून धोरणात्मक भागीदारी आखण्यात येईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव पेरियासामी कुमारन यांनी वार्ताहरांना सांगितलं. परस्पर भागीदारी वृद्धिंगत करण्यासाठी दोन्ही देशांच्या नेत्यांनी २०२५ ते २०२९ या वर्षांसाठी कृती आराखडा स्वीकारल्याचंही कुमारन म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक घेण्याची प्रक्रिया ऑक्टोबर महिन्यात सुरू होणार असून ती पुढच्या वर्षी जानेवारी महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी व्यक्त केली. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीची तयारी सुरू असून प्रभाग रचना, मतदार याद्या या सर्व प्रकारच्या कार्यवाहीला वेळ लागणार आहे. त्यामुळं या निवडणुका

टप्प्याटप्प्याने होणार असल्याची शक्यताही त्यांनी वर्तवली. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाला मान्यता दिल्याने सोडत पध्दतीने प्रभागातून आरक्षण काढण्यात येईल, असं त्यांनी सांगितले. या निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरण्यात येणार नाही असं वाघमारे यांनी स्पष्ट केलं.

**होल्ड बाईट वाघमारे - (१४ सेकंद)**

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या १४ हजार पुरुषांना पैसे परत करण्याची नोटीस राज्य सरकारनं पाठवली आहे. महिनाभरात पैसे परत नाही दिले नाही तर गुन्हा दाखल करण्याचा इशारा सरकारनं त्यांना नोटीशीद्वारे दिला आहे. योजना सुरू झाल्यापासून सुमारे साडे २१ कोटी रुपये या पुरुषांच्या खात्यात जमा झाले आहेत.

**<><><><><>**

ओला, उबेर, रॅपिडोच्या धर्तीवर राज्य सरकार ‘छावा राइड’ या ॲपच्या माध्यमातून राज्य सरकार नागरिकांना खासगी वाहतूक सुविधा पुरवणार आहे. या ॲपवरुन नागरिकांना रिक्षा, टॅक्सी आणि बसचे आरक्षण करता येईल. एसटी महामंडळ हे ॲप सुरू करणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचं आज प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. ते एकोणऐंशी वर्षांचे होते. नवी दिल्लीच्या राममनोहर लोहिया रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते.

संविधानाचं ३७०वं कलम रद्द करुन जम्मूकाश्मीरचा विशेष दर्जा काढून घेण्याची कारवाई सत्यपाल मलिक यांच्या कार्यकाळात झाली होती.

मलिक यांच्या राजकीय कारकिर्दीला १९७४ मधे उत्तरप्रदेश विधानसभेतून प्रारंभ झाला. त्यानंतर त्यांनी अनेकदा राज्यसभेत उत्तरप्रदेशचं प्रतिनिधित्व केलं. लोकसभेत ते अलिगढ मतदारसंघातून जनता दलाच्या तिकिटावर निवडून गेले होते. बिहार, ओदिशा, गोवा आणि मेघालयचं राज्यपालपदही त्यांनी भूषवलं होतं.

**<><><><><>**

झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री शिबू सोरेन यांच्या पार्थिवावर आज त्यांच्या मूळ गावी नेमरा इथं अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांचे सर्वात धाकटे पुत्र आणि दुमकाचे आमदार बसंत सोरेन यांनी अंत्यविधि केले. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, काँग्रेसचे खासदार सुबोधकांत सहाय आणि इतर अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**//<><><><><>//**